उद्योग संचालनालयाच्या आस्थापनेवरील
उद्योग सहसंचालक (गट-अ) या संवर्गातील
अधिकाऱ्यांची विनंती बदली -२०१९

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
शासन आदेश क्रमांक :- बदली-२०१९/३३९/प्र.क्र.५३/उद्योग-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०६ ऑगस्ट, २०१९

वाचा :- १) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियम आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५
२) उद्योग संचालनालयाचे पत्र क्र.उसं/आस्था-१/रापअ/वर्ग-१/सर्व बदली/२०१९/१३९, दि.२७.०५.२०१९
३) नागरी सेवा मंडळ क्र.१ च्या दिनांक १२.०६.२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

शासन आदेश :-

उद्योग संचालनालयाच्या आस्थापनेवरील उद्योग सहसंचालक (गट-अ) या संवर्गातील अधिकाऱ्यांची संदर्भ क्र.१ चा अधिनियम व सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ मधील प्रकरण दोन मधील कलम ४ (५) नुसार कलम ६ मध्ये नमूद केलेल्या लगतपूर्व बदली करणाऱ्या लगत वरीष्ठांच्या मान्यतेने खालीलप्रमाणे विनंती बदली करण्यात येत आहे. :

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम	सध्या कार्यरत असलेले ठिकाण	बदलीनंतरची पदस्थापना
१.	श्री.स.सं.सुरवसे, उद्योग सहसंचालक	उद्योग संचालनालय, मुंबई	उद्योग सहसंचालक, विभागीय कार्यालय, पुणे या रिक्त पदावर

२. उपरोक्त बदली झालेल्या अधिका-यांना कार्यालय प्रमुख यांनी बदली पदावर हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे. संबंधीत अधिका-यांनी बदलीच्या पदावर हजर झाल्यानंतर लगेचच कार्यभार हस्तांतरण प्रमाणपत्रांसह त्यांचा रुजु अहवाल उद्योग संचालनालय यांच्या मार्फत शासनास सादर करावा तसेच बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल, सेवापुस्तक अंतिम वेतन प्रमाणपत्र तात्काळ नवीन कार्यालयाकडे पाठविण्याबाबत सूचना देण्यात याव्यात.

३. विनंती बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल, सेवापुस्तक अंतिम वेतन प्रमाणपत्र तात्काळ नवीन कार्यालयाकडे पाठविण्याबाबत सूचना देण्यात याव्यात तसेच त्यांना पदग्रहण अवधी व त्या संदर्भातील लाभ अनुज्ञेय होणार नाहीत.

४. संबंधीत अधिकारी यांनी बदलीच्या पदावर हजर न होता लोकप्रतिनिधीमार्फत बदली रद्द करणे किंवा अन्यत्र बदली मिळणेबाबत शासनावर दबाव आणल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम,१९७९ मधील तरतुदीनुसार ते शिस्तभंग विषयक कारवाईस पात्र ठरतील याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०६१७३३४७५०१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Namdeo Kondiba Bhosale

Digitally signed by Namdeo Kondiba Bhosale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db1ca2341132b954db9052b5ef3bd93e7410456a96fa70df7ff81c68231fcd3, serialNumber=8c6a286229ecc7982a08553f49d547ef64be25c7f26fc96324ece7cccbfeb8c5, cn=Namdeo Kondiba Bhosale
Date: 2019.08.06 17:42:24 +05'30'

(डॉ.ना.कों.भोसले)
शासनाचे उप सचिव.

प्रति,

विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई

प्रत

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२. मा.मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव,
३. मा.राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव,
४. मा.विरोधी पक्षनेता विधान सभा/विधान परिषद यांचे खाजगी सचिव,
५. महालेखापाल, (लेखा अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई / नागपूर,
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
८. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
९. उद्योग सहसंचालक, विभागीय कार्यालय, पुणे
१०. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पुणे / कोल्हापूर / सांगली / सातारा / सोलापूर
११. संबंधित अधिकारी (उद्योग संचालनालयामार्फत)
१२. निवडनस्ती (उद्योग-३)